मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट संचलित,

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय

लातूर ४१३ ५३१

(कनिष्ठ व वरिष्ठ)

(एच.एस.सी.बोर्ड द्वारा 'अ' दर्जा)

# माहिती-पुस्तिका

२०१६-२०१७



# मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट, विलासनगर

चिंचोलीराव (वाडी), ता.जि.लातूर

## • *विश्वस्त मंडळ* •


| | |
|---|---|
| स्व. मा. ना. श्री. विलासरावजी दगडोजीराव देशमुख | संस्थापक |
| मा. आ. श्री. दिलीपरावजी दगडोजीराव देशमुख | अध्यक्ष |
| मा. श्री. अमित विलासरावजी देशमुख | कार्यकारी विश्वस्त |
| मा. श्री. शंकररावजी तात्याराव चव्हाण | विश्वस्त |
| मा. श्री. सय्यद नझीर अहमद म. यासीन | विश्वस्त |
| मा. श्री. विजयमूर्ती मन्मथअप्पा शेटे | विश्वस्त |


## • *स्थानिक व्यवस्थापन समिती* •


| | |
|---|---|
| मा. आ. श्री. दिलीपरावजी दगडोजीराव देशमुख | अध्यक्ष |
| मा. श्री. अमित विलासरावजी देशमुख | कार्यकारी विश्वस्त |
| मा. श्री. शंकररावजी तात्याराव चव्हाण | सदस्य |
| मा. श्री. सय्यद नझीर अहमद म. यासीन | सदस्य |
| प्रा. श्री. डॉ. प्रदीप नागनाथराव देशमुख | प्राध्यापक प्रतिनिधी |
| प्रा. श्री. गुरूनाथ सुधाकर देशमुख | प्राध्यापक प्रतिनिधी |
| प्रा. सौ. सविता चोखोबा किर्ते | प्राध्यापक प्रतिनिधी |
| श्री. सत्यनारायण मुरलीधर भुतडा | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |

# मातोश्री



## कै. श्रीमती सुशीलादेवी दगडोजीराव देशमुख

आमचे प्रेरणास्थान



स्व. मा. ना श्री. विलासराव देशमुख
केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान व भुविज्ञान मंत्री, (भारत सरकार)

आमचे आधारस्तंभ



## मा. आ. श्री. दिलीपरावजी देशमुख

मा. अध्यक्ष मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट , लातूर
तथा माजी क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्य

आमचे मार्गदर्शक



## मा. आ श्री. अमितजी देशमुख

कार्यकारी विश्वस्त

मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर



श्री.नजीर अहमद म.यासीन सय्यद

विश्वस्त



श्री विजयमूर्ती शेटे

विश्वस्त



श्री.शंकरराव चव्हाण

विश्वस्त



डॉ.अजय पाटील

प्राचार्य



आय.आय.टी. ॲडव्हान्स् परीक्षेस पात्र झाल्यामुळे हाळे विजयकुमार दिलीपराव
यांचा सत्कार करताना
संस्थेचे अध्यक्ष मा. दिलीपरावजी देशमुख साहेब व प्रा.डॉ. अजय पाटील

# प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये आपण आमच्या महाविद्यालयात प्रवेश घेत आहात, आपले मन: पूर्वक स्वागत !

आमच्या शिक्षणसंस्थेने ज्ञान, चारित्र्य व देशप्रेम संवर्धनासाठी शिक्षण हे उद्दिष्ट समोर ठेवून शैक्षणिक वाटचाल करण्याचा निर्धार केला आहे.

आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात ज्ञान हे सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य होत असून चारित्र्य निर्मितीचे संवर्धन-संगोपन शिक्षणातून घडावे हे ध्येय आपल्यासमोर आहे. या माध्यमातून व्यक्तिच्या नितीमान समाजाचा व राष्ट्राचा विकास होण्याबरोबर देशप्रेमाची भावना दृढ व्हावी हा संकल्प आम्ही मनी बाळगला आहे.

सद्य:स्थितीत चांगले व दर्जेदार शिक्षण हे उच्च शिक्षणासमोरचे आव्हान असून नॅक श्रेणीसाठी आता गुणवत्तेला पर्याय नसल्यामुळे डिसेंबर २००४ मध्ये राष्ट्रीय मुल्यांकन अधिस्विकृती समिती (नॅक) कडून या महाविद्यालयाचे मुल्यांकन करून घेण्यात आले असून महाविद्यालयास बी-प्लस (+) हा दर्जा प्राप्त झाला आहे. या यशात मांजरा चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक मा.कै. ना.श्री. विलासरावजी देशमुखसाहेब, अध्यक्ष मा.आ.श्री. दिलीपरावजी देशमुखसाहेब, कै. ॲड.बी.व्ही.काळेसाहेब, कार्यकारी विश्वस्त मा.आ.श्री.अमितजी देशमुख साहेब व सर्व संचालक तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांचा बहुमोल वाटा आहे. राष्ट्रीय मुल्यांकन अधिस्विकृती समीतीकडून पुनर्मुल्यांकन (Re Accridiation) करून घेण्यासाठी महाविद्यालय सज्ज आहे. गुणवंत विद्यार्थी हेच महाविद्यालयाचे भूषण व अलंकार आहेत. संस्था प्रमुखांच्या मार्गदर्शनानुसार आम्ही शिक्षण क्षेत्राच्या पावित्र्यासाठी प्रयत्नशील असून महाविद्यालयाचे प्रशासन हे महाविद्यालयाची गतीमानता वाढविण्याच्या दृष्टीने सक्रीय असेल असा आमचा प्रयत्न आहे. मी व माझे सर्व सहकारी या सर्व कार्यप्रणालीचा 'मानबिंदू' आहोत तर आपण विद्यार्थी 'केंद्रबिंदू' आहात. विद्यार्थ्यांना सर्वतोपरिने प्रेरणा देऊन प्राध्यपकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करणे ही प्राचार्य म्हणून माझी जबाबदारी आहे. आमचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांची जडणघडण हेच आहे. यास्तव विद्यार्थी व त्यांचे पालक यांचीही काही जबाबदारी असून पालकांनी आपल्या पाल्याकडे काही बाबतीत लक्ष दिले पाहिजे व विद्यार्थ्यांची मनापासून शिकण्याची तळमळ असली पाहिजे. तरच प्राध्यापकही मनापासून मार्गदर्शन करू शकतील आणि शिक्षणाचा दर्जा उंचावेल. प्राध्यापक हा शिक्षण प्रक्रियेचा कणा असून त्यांचे अध्यापन हे नियमित व प्रभावी व्हावे म्हणून आम्ही आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची गुणवत्ता सतत वाढवण्याच्या दृष्टीने त्यांच्या पाठीशी आहेत. नेट-सेट परीक्षा, संशोधनाच्या क्षेत्रात, शोधनिबंध

लेखन, चर्चासत्र परिसंवाद या माध्यमातून महाविद्यालयातील प्राध्यापक सतत अभ्यासात राहून अध्ययन अध्यापन करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. प्राध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाकडे महाविद्यालयाचे विशेष लक्ष आहे. आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग अध्यापनाची कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच शैक्षणिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याच्या दृष्टीने संगणक-इंटरनेट आदि अद्ययावत माहिती तंत्रज्ञानाच्या अभ्यासाकडेही लक्ष वेधत आहेत. प्राध्यापकांच्या अध्यापनातील उपक्रमशीलता वाढवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये अनेक सुप्त शक्ती दडलेल्या असतात. त्या शक्तींचा विकास किंवा अविष्कार म्हणजेच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होय.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात येऊन अभ्यासाबरोबर विचारसन्मुख व्हावे, स्वत:च्या चारित्र्याची जडणघडण करावी, समता, स्वातंत्र, बंधूता-धर्मनिरपेक्षता या लोकशाही मूल्यांचे संस्कार आत्मसात करून संस्कारक्षम बनावे. 'युवक हा सुसंस्कृत मनोवृत्तीचा एक आदर्श नागरिक असावा'. शिक्षण आणि जीवन याचा मेळ घालून शिक्षणातून सर्वोत्तम जीवनशैलीचा स्वीकार युवकांनी करावा म्हणून महाविद्यालय आपणास मार्गदर्शन करण्यास प्रयत्नशील आहे. यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, महत्वाचा आहे. आपले भावी आयुष्य उजवल, यशस्वी ठरो हा प्राचार्य या नात्याने मनस्वी शुभेच्छा व आपल्या प्रवेशाचे स्वागत.

धन्यवाद!

**डॉ.अजय पाटील**
**प्राचार्य**

# प्रवेशासंबंधी महत्त्वाच्या सूचना

## (कनिष्ठ महाविद्यालय/ वरिष्ठ महाविद्यालय)

कला, वाणिज्य, विज्ञान व वरिष्ठ महाविद्यालय विद्याशाखेत नोंदणी करूनच नियमाप्रमाणे प्रवेश दिला जाईल. नोंदणी अर्जासोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

१) टी. सी. ची सत्यप्रत.

२) गुणपत्रिकेची सत्यप्रत.

३) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत.

४) योग्यता प्रमाणपत्र (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी) किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी थेट प्रवेश दिला जातो. त्यासाठी वरील कागदपत्रे प्रवेश अर्जासोबत जोडावीत. फॉर्मसोबत पासपोर्ट फोटोची एक नवी प्रत आवश्यक आहे.

५) वरिष्ठ महाविद्यालयासाठी वरील कागदपत्रांबरोबर इ-१० वी गुणपत्रीकेची सत्यप्रत आवश्यक.

## अन्य सूचना :

- कार्यालयात दिलेली मुळकागदपत्रे परत दिली जात नाहीत.
- आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती विद्यार्थ्यांनी जवळ ठेवाव्यात.
- टी. सी. वर खाडाखोड करणे दखलपात्र गुन्हा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द केला जातो.
- महाविद्यालयाकडून डुप्लिकेट टी. सी. केवळ मायग्रेशन प्रमाणपत्रासाठी दिली जाते. अन्य कोणत्याही कारणासाठी डुप्लिकेट टी. सी. दिली जात नाही.
- मूळ प्रमाणपत्रे कार्यालयात दाखल केल्यावर त्याबद्दल पावती घ्यावी.
- प्रत्येक विषयाच्या जागा मर्यादीत असल्यामुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. एक वेळ निवडण्यात आलेले विषय बदलून मिळणार नाहीत.
- ११ वी साठी निवडलेले विषयच १२ वी साठी निवडावे लागतील.
- १२ वी वर्गात पुनर्प्रवेश अपवादात्मक परिस्थितीतच दिला जातो.

# प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

प्रवेश अर्जासोबत खालील मूळ प्रमाणपत्रे व प्रत्येकाच्या दोन प्रमाणित सत्यप्रती (Xerox)जोडाव्यात.

१) गुणपत्रिका
२) शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र
३) वर्गीकृत / अनुसूचित जाती – जमातीचा दाखला (मागासवर्गीय)
४) स्थलांतराचा दाखला.
५) पात्रता प्रमाणपत्र
६) उत्पन्नाचा दाखला
७) नादारी अर्जाच्या दोन प्रती. इ. ११ वीसाठी Open विद्यार्थी
८) E.B.C.फॉर्म दोन प्रती इ. १२ व बी.ए. I.II.III Open विद्यार्थीसाठी
९) अपत्य प्रमाणपत्र – दोनप्रती सर्वांसाठी
१०) प्रतिज्ञापत्र – मुलींसाठी – दोनप्रती इ. ११ वी व इ. १२ Open विद्यार्थीनीसाठी

## शिकविले जाणारे वर्ग व विषय

### कनिष्ठ महाविद्यालय

१० + २ + ३ या नव्या अभ्यासक्रमानुसार सुरू झालेल्या अकरावी व बारावी इयत्तेच कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचे वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत.

प्रवेश द्यावयाची संख्या मर्यादीत आहे. गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे व फीस दिल्यानंतर प्रवेश कायम केला जाईल.

**१) इयत्ता अकरावी (कला विभाग)**

एकूण सहा विषय राहतील,

**आवश्यक :** खालील 'अ' गटात एक व 'ब' गटातील एक असे आवश्यक दोन विषय निवडावे.

अ) इंग्रजी, ब) मराठी किंवा हिंदी (द्वितीय भाषा)

**ऐच्छिक :**

खालीलपैकी कोणतेही चार विषय निवडावे.

१) इतिहास किंवा सहकार, २) समाजशास्त्र ३) राज्यशास्त्र, ४) भूगोल किंवा अर्थशास्त्र.

वर्षभरात पूर्वसुचनेने दोन सत्रात परीक्षा होतील. याशिवाय वेळोवेळी वर्गचाचण्या होतील. सत्र परिक्षेस व वेळोवेळी होणाऱ्या या वर्गचाचण्यास मिळालेल्या गुणांची पडताळणी होईल.

**२) इयत्ता बारावी (कला विभाग)**

इयत्ता अकरावीप्रमाणे सहा विषय राहतील. वर्षअखेर महाराष्ट्र राज्य मंडळातर्फे परीक्षा घेण्यात येईल. इयत्ता अकरावी व बारावीला देण्यात आलेला प्रवेश महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नियमानुसार कायम होईल.

## विज्ञान विभाग

### (इयत्ता अकरावी व बारावी)

एकूण सहा विषय राहतील

१) आवश्यक विषय:इंग्रजी २) द्वितीय भाषा : मराठी/ हिंदी

३) ऐच्छिक विषय:खालीलपैकी कोणताही एक गट

अ) पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, जीवशास्त्र, गणित

ब) पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, जीवनशास्त्र, भूगोल

क) पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, जीवशास्त्र, क्रॉप सायन्स

ड) पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र, गणित, इलेक्ट्रॉनिक्स

क्रॉपसायन्स व इलेक्ट्रॉनिक्स या विषयात प्रवेश मर्यादीत आहेत. गुणवत्तेनुसार प्रवेश दिले जातील.

## सि.ई.टी. सेल

१. वैद्यकीय व अभियांत्रीकी अभ्यासक्रमासाठी घेतल्या जाणाऱ्या देश व राज्य पातळीवरील प्रवेश परिक्षामध्ये यश संपादन करण्यासाठी महाविद्यालयातर्फे NEET/MHT CET/JEE या परिक्षांची तयारी करून घेतली जाते.

२. इ. १२ वी च्या उन्हाळी वर्गापासून व ११ वी च्या प्रवेशानंतर दर १५ दिवसात संपलेल्या अभ्यासक्रमावर सि.ई.टी. ची परिक्षा घेतली जाते.

३. प्रत्येक महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार अशा महिन्यातून दोन परिक्षा घेतल्या जातात. अशा १२ वी च्या एकूण १६ व ११ वी च्या १२ परिक्षा घेतल्या जातात.

४. परिक्षा संपल्यानंतर लागलीच दोन दिवसात बोर्डावर निकाल लावण्यात येतो. त्याचबरोबर जे विद्यार्थी परिक्षेस गैरहजर असतील त्यांच्या पालकांना याबद्दल एस.एम.एस. व्दारे कळविले जाते.

५. इ. ११ वी १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे व विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक परिक्षेतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर प्रथम, व्दितीय व तृतीय असे रोख पारितोषक वर्षातून दोन वेळा बक्षिस वितरणाचा कार्यक्रम ठेवून प्राचार्य व तज्ञ पाहूण्यांच्या मार्गदर्शनानंतर त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येते.

६. वैद्यकीय व अभियांत्रिक अभ्यासक्रमाच्या NEET/MHT CET/JEE परिक्षेच्या तयारीसाठी संस्थेने CET CELL ची स्थापना केली आहे. सि.ई.टी. सेल प्रमुख वेळोवेळी प्राध्यापकासोबत चर्चा करून विद्यार्थ्यांच्या गुणात्मक वाढीसाठी सर्वतोपरी निर्णय घेतात.

७. सि.ई.टी. परिक्षेचे वाढते महत्व लक्षात घेऊन वेगवेळया लेखकांची व प्रकाशकांची उएढ चे पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध करून दिले जातात.

८. १२ वी बोर्ड परिक्षा संपल्यानंतर सि.ई.टी. परिक्षेच्या तयारीसाठी ८ ते १० परिक्षा घेतल्या जाणार आहेत. अशा एकूण वर्षभर २५ परिक्षा घेतल्या जातात.

९. ११ वी १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून दोन वेळा पालक मेळाव्याचे आयोजन केले जाते. या पालक मेळाव्यात उपस्थित राहणे अनिवार्य असते.

१०. पालकमेळाव्यामध्ये पालकांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी व गुणात्मक वाढीसाठी आपले विचार मांडावेत हा या मागचा हेतू असतो. पालक मेळाव्यात पालकांच्या काही सुचना असतील तर त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो.

## वाणिज्य विभाग

### (इयत्ता अकरावी व बारावी)

एकूण सहा विषय राहतील

१) आवश्यक विषय : इंग्रजी

२) द्वितीय भाषा : मराठी किंवा हिंदी

३) ऐच्छिक विषय : खालील चार विषय

अ) वाणिज्य संघटन, ब) पुस्तपालन व लेखाकर्म, (इंग्रजी माध्यम) क) चिटणीसांची कार्यपध्दती, ड) अर्थशास्त्र

### किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम

१) आवश्यक : इंग्रजी, २) द्वितीय भाषा : मराठी / हिंदी,

३) मुलभूत अभ्यासक्रम, ४) खालीलपैकी कोणताही एक विषय

अ) हार्टिकल्चर, ब) अकाऊंटींग अॅण्ड ऑडिटींग, क) क्रॉप सायन्स

## वरिष्ठ महाविद्यालय

सक्तीच्या इंग्रजी विषयाची व दुसरी भाषा मराठी व हिंदी विषयाचे प्रत्येकी ५० गुणांचे एकेक पेपर व ऐच्छिक विषयाचे प्रत्येकी ५० गुणांचे सत्रनिहाय पेपर्स असतील व त्याची परीक्षा विद्यापीठामार्फत दोन सत्रात होईल. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाला पहिल्या वर्षाचेच विषय घ्यावे लागतील.

**आवश्यक विषय :**

१) इंग्रजी, २) द्वितीय भाषा : मराठी, हिंदी

**ऐच्छिक विषय :**

खालीलपैकी एका गटातून कोणताही एक असे एकूण तीन विषय निवडावेत.

| | | |
|---|---|---|
| गट : | १) इंग्रजी / मराठी / हिंदी | २) इतिहास / समाजशास्त्र |
| | ३) राज्यशास्त्र / भूगोल | ४) अर्थशास्त्र / लोकप्रशासन |

**सूचना :**

१) बी.ए. द्वितीय वर्षासाठीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रथम वर्षासाठी निवडलेल्या विषयाचीच परीक्षा द्यावी लागते.

२) बी. ए. तृतीय वर्षासाठीच्या विद्यार्थ्यांना त्यांनी निवडलेल्या फक्त ऐच्छिक विषयाचींच परीक्षा द्यावी लागेल. त्यांना आवश्यक भाषा व द्वितीय भाषा परीक्षा द्यावी लागत नाही.

३) विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय सर्व प्रवेश तात्पुरते समजण्यात येतील.

**घटक विद्यार्थी : (इ. १२ वी साठी)** ई.बी.सी.फॉर्म ११ वी मार्क मेमो सत्यप्रत्य, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, प्रवेश झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत कार्यालयात द्यावे.

**नादारीसंबंधी सूचना :**

अ) वडीलांचे गतवर्षाचे उत्पन्न रू. ४८,०००/- पेक्षा कमी असल्याचे प्रमाणपत्र. त्यावर सरपंच किंवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची स्वाक्षरी असावी.

ब) वडील हयात नसल्यास आईच्या नावाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र व वडील हयात नसल्याचे प्रमाणपत्र.

क) आई-वडिल हयात नसतील तर पालकाच्या अथवा स्वत:च्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक.

ड) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांच्या आत नादारी अर्ज व इतर प्रमाणपत्रे व्यवस्थित भरून दाखल करावीत. अर्ज व प्रमाणपत्र वेळेत न दिल्यामुळे मंजूर न झालेल्या नादारीबाबत संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील.

इ) विद्यार्थ्यांचे वडील अथवा पालक नोकरी करीत असतील तर ती नोकरी कशा प्रकारची, ठिकाण, पगार इत्यादी संबंधीचे त्यांच्या वडिलांचे / पालकांचे संबंधित कार्यालयीन प्रमाणपत्र.

फ) वरिष्ठ महाविद्यालयासाठी तहसीलदार यांचे कमाल १,००,०००/-रूपयापर्यंतचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

नोट :- प्रथम सर्व प्रवेश हंगामी स्वरूपाचे असतील नंतर उणीवा आढळून आल्यास तसे प्रवेश रद्द केले जातील.

**शिष्यवृत्ती व सवलती :**

राज्य सरकारतर्फे व केंद्र सरकारतर्फे खालील शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यास मिळू शकते.
शिष्यवृती अर्जासाठी अधिक चौकशी महाविद्यालयातील कार्यालयात करावी.

१) मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती (भारत सरकार शिष्यवृत्ती योजना)
२) अपंग विद्यार्थी केंद्र शासन शिष्यवृत्ती.
३) गुणवत्ता शिष्यवृत्ती.
४) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला-मुलींना मिळणारी आर्थिक सवलत.
५) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींना मिळणारी आर्थिक सवलत.

शिष्यवृत्ती सवलत मिळवून देण्यात महाविद्यालय प्रयत्नशील राहील.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खास सूचना :**

१) ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वडील अथवा पालकाचे उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त असल्यामुळे शिष्यवृत्ती मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांना सरकारी नियमाप्रमाणे मोफत शिक्षण. फ्रीशिप सवलतीचा फॉर्म भरून द्यावा.
२) एकाच इयत्तेत दोन वेळा नापास होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सरकारी नियमाप्रमाणे मोफत शिक्षण.
३) योग्य व पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना भा. स. शि. (जी.ओ.आय.) शिष्यवृत्ती कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर देण्यात येईल.
४) नियमानुसार ७५ टक्के उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळेल.
५) भा. स. शिष्यवृत्ती अर्ज दिलेल्या मुदतीत सर्व कागदपत्रांची पूर्तता करून कार्यालयात दाखल करावेत. मुदतीनंतर फॉर्म स्वीकारले जाणार नाहीत व शिष्यवृत्तीबाबत विद्यार्थी जबाबदार राहील.

**शिस्तीसंबंधीचे नियम :**

१) प्रवेश घेताना घेतलेली विद्याशाखा व विषय कुठल्याही कारणास्तव बदलता येणार नाहीत.
२) विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाच्या तासासाठी ७५ टक्के हजेरी असली पाहिजे.
३) विद्यार्थ्यांनी सूचना फलकावरील सूचनांची नोंद घ्यावी.

४) वर्गात, महाविद्यालयीन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिस्त राखली पाहिजे.
५) विद्यार्थ्यांनी वर्ग चालू असताना व्हरांड्यात फिरण्यास बंदी आहे.
६) महाविद्यालयाच्या भिंतीवर, बाकावर व फळ्यावर काहीही लिहू नये.
७) ग्रंथालय, वसतिगृह व विविध मंडळांसाठी बनविलेल्या नियमांचे पालन होणे अनिवार्य राहील.
८) पूर्व परवानगीशिवाय महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कुठल्याही संस्था, मंडळ इत्यादी काढता येत नाही.
९) विद्यार्थ्यांनी केवळ स्वत:च्याच विषयांच्या तासांना हजर राहावे. इतर वर्गांच्या तासांना विनापरवानगीने उपस्थित राहू नये.
१०) विद्यार्थ्यांना परवानगीशिवाय स्टाफरूम व कार्यालयात येण्यास बंदी आहे.
११) फर्निचर व विद्युत बांधणी यांची नासधूस करताना आढळल्यास शिक्षेस पात्र ठरविले जाईल.
१२) विद्यार्थ्यांनी दररोज ओळखपत्र बाळगणे आवश्यक आहे.
१३) महाविद्यालयाच्या परिसरात पान, तंबाखू व धुम्रपानास मनाई आहे.
१४) आपले महाविद्यालय / वर्ग स्वच्छ राहतील याची सर्वांनी काळजी घ्यावी.

**बेशिस्त वर्तणुकीबद्दल शिक्षेची तरतूद :**

१) विनयभंगाच्या गुन्ह्यांची नोंद केली जाते. २) पालकांशी मोबाईलवरून संपर्क साधला जाईल. ३)आर्थीक दंड आकारला जाईल.४) महाविद्यालयीन सवलती बंद करण्यात येतील. ५) विशिष्ट कालावधीसाठी उपस्थिती नाकारली जाईल. ६) बेशिस्तीचे स्वरूप गंभीर असल्यास प्रवेश रद्द केला जाईल. ७) टी. सी. वर गैरवर्तणुकीचा शेरा लिहिला जाईल.

## वर्गनिहाय विविध प्रकारच्या शुल्काचे दर दर्शविणारा तक्ता
## फीस संबंधी माहिती २०१३–२०१४

| अ. क्र. | तपशील | कला व वाणिज्य | | विज्ञान | |
|---|---|---|---|---|---|
| | | ११ वी | १२ वी | ११ वी | १२ वी |
| १. | प्रवेश फॉर्म व माहिती पुस्तिका | ०० | ०० | ०० | ०० |
| २. | नोंदणी शुल्क | १० | १० | १० | १० |
| ३. | महाविद्यालयीन परीक्षा फिस | १०० | १५० | १०० | १५० |
| ४. | ग्रंथालय फीस | १०० | १०० | १०० | १०० |
| ५. | विद्यार्थी ओळखपत्र | १० | १० | १० | १० |
| ६. | प्रयोगशाळा शुल्क (फक्त विज्ञान शाखा) | – | – | १०० | १५० |
| ७. | प्रवेश फीस | १६ | १८ | १६ | १८ |
| ८. | टर्म फीस | ३२ | ३६ | ३२ | ३६ |
| ९. | अध्यापन शुल्क | १९२ | २१६ | १९२ | २१६ |

**नोट :**

महाराष्ट्र राज्यातील शालान्त परीक्षा अथवा विद्यापीठाच्या अधिकार कक्षेतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पात्रता प्रमाणपत्र शुल्क रू. ७५/–. शासनाच्या निर्णयानुसार वरील तक्त्यात दर्शविलेल्या फीस बदलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.


## फीस संबंधी माहिती (वरिष्ठ महाविद्यालय)

### बी. ए. प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष २०१५ –२०१६

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | नोंदणी फीस | २५.०० |
| २. | प्रवेश फीस | २५.०० |
| ३. | इलिजिबिलिटी फीस | १००.०० |
| ४. | शिक्षण फीस | ८००.०० |
| ५. | ग्रंथालय फीस | १००.०० |
| ६. | ग्रंथालय डिपॉझीट | १००.०० |
| ७. | सत्र परिक्षा फीस | १००.०० |
| ८. | विद्यार्थी साह्य फीस | २५.०० |
| ९. | ओळखपत्र | २५.०० |
| १०. | विद्यापीठ खेळ व क्रीडा | ५०.०० |
| ११. | विद्यापीठ कल्याण निधी | ४०.०० |
| १२. | जिमखाना फीस | ५०.०० |
| १३. | नियतकालिक फीस | २५.०० |
| १४. | वार्षिक स्नेहसंमेलन | ४०.०० |
| १५. | महाविद्यालयीन विकासनिधी | २०.०० |
| १६. | इतर फीस | १०.०० |
| १७. | आंतर विद्यापीठ क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम | १०.०० |
| १८. | आपत्कालीन निधी | १०.०० |
| १९. | अश्वमेध स्पर्धा. | ३५.०० |
| २०. | विद्यार्थी सुरक्षा विमा | ८.०० |
| २१. | कमवा शिका योजना | १०.०० |
| २२. | राष्ट्रीय सेवा योजना | १०.०० |

इलिजिबिलिटी फीस फक्त प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना राहील. वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले फीसचे दर विद्यापीठ परिपत्रकानुसार बदलण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत. फीसमधील बदल विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१४ मार्च २०१५ व मार्च २०१६ चा निकाल




## MH-CET परीक्षेत गुणवत्ता धारक विद्यार्थी

| अ.क्र. | वर्ष | मेडीकल | इंजिनियरींग |
|---|---|---|---|
| १. | २०१४ | १० | ६२ |
| २. | २०१५ | १२ | ६९ |
| ३. | २०१६ | ११ | ७२ |

## उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा गुणवत्ता वाढ तपशिल फेब्रुवारी २०१६

| १२ कला : | १० वी टक्केवारी (११ वी प्रवेश) | I १२ वी टक्केवारी |
|---|---|---|
| १) | ३५% ते ४५ % | ५५% ते ६५% |
| २) | ४५% ते ७० % | ६०% ते ८२ % |

| १२ वाणिज्य : | १० वी टक्केवारी (११ वी प्रवेश) | I १२ वी टक्केवारी |
|---|---|---|
| १) | ३५% ते ४५ % | ६०% ते ७०% |
| २) | ४५% ते ७० % | ७०% ते ८७ % |

| १२ विज्ञान : | १० वी टक्केवारी (११ वी प्रवेश) | I १२ वी टक्केवारी |
|---|---|---|
| १) | ४०% ते ५० % | ५५% ते ६५% |
| २) | ५०% ते ७० % | ६५% ते ८८ % |

## ग्रंथालय विभाग

### माहिती व सूचना :

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ओळखपत्र घेणे आवश्यक राहील. ग्रंथालय/वर्गात व महाविद्यालयच्या परिसरात विद्यार्थ्यांजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

२) ग्रंथालयातून ग्रंथ घेत असताना त्याची पाने तपासून घ्यावीत. ग्रंथाची पाने नसतील तर ताबडतोब ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. ग्रंथाची निगा राखावी व पाने फाडू नयेत.

३) ग्रंथाची पाने फाडल्यास संपूर्ण ग्रंथाचा दंड विद्यार्थ्यांना भरावा लागेल अथवा नवीन ग्रंथ घेऊन द्यावा लागेल.

४) ग्रंथ हरवल्यास किंवा खराब झालेल्या ग्रंथाचे झेरॉक्स करणे शक्य नसल्यास नवीन ग्रंथ उपलब्ध करून द्यावा लागेल. अन्यथा ग्रंथाच्या दुप्पट रक्कम वसुल केली जाईल.

५) ग्रंथ परतीसाठी विलंब केल्यास विलंब शुल्क आकारण्यात येईल.

६) ग्रंथालयातील कर्मचारीकिंवा संबंधितांशी असभ्य वर्तन करणे, आज्ञाभंग करणे, अकारण वितंडवाद घालणे असे बेशिस्त वर्तन आढळून आल्यास विद्यार्थ्यास दंड आकारला जाईल व गंभीर स्वरूपाचे वर्तन आढळून आल्यास विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द केला जाईल.

### ग्रंथालय देव – घेव विभाग

१) ग्रंथालयाच्या देव-घेव विभागातून विद्यार्थ्यांना सभासदपत्रावर (बी.टी.) पाठ्यपुस्तके व इतर ग्रंथ सात दिवसांकरिता दिले जातील.

२) संदर्भग्रंथ व दुर्मिळ ग्रंथ बाहेर दिले जाणार नाहीत. ग्रंथालयातच अशी पुस्तके ओळखपत्रावर घेऊन वाचता येतील.

३) देव – घेव विभाग सकाळी १० ते १ व दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत चालू राहील. प्रसंगानुरूप वेळेत बदल करण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

४) सभासदपत्रकावरील पुस्तके दिलेल्या मुदतीच्या आत परत न केल्यास प्रति आठवडा १.०० रूपये याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात येईल.

### विशेष पुस्तक पेढी :

१) इयत्ता अकरावी व बारावी कला आणि वाणिज्य वर्गातील विद्यार्थ्यांना केवळ ७५/- रूपये ग्रंथालय शुल्क आकारून वर्षभरासाठी भाषा विषय सोडून सर्व क्रमिक पुस्तके दिली जातील.

२) इयत्ता अकरावी व बारावी विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना केवळ १००/- रूपये ग्रंथालय शुल्क आकारून वर्षभरासाठी भाषा विषय सोडून सर्व विषयांची क्रमिक पुस्तके दिली जातील.

३) पदवी विभागातील विद्यार्थ्यांना रू. १००/- ग्रंथालय शुल्क आकारून वर्षभरासाठी अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा सोडून २ पुस्तके दिली जातील.

४) काही निवडक, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी २ क्रमिक पुस्तके दिली जातील.

५) पुस्तक पेढीतून पाठ्यपुस्तके घेण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश शुल्क पावती, मूळ प्रमाणपत्र दाखल केलेली पावती व ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

६) वार्षिक परिक्षा संपलेल्या तारखेपासून ४ दिवसांच्या आत पुस्तक पेढीतील वर्षभरासाठी दिलेली क्रमिक पाठ्यपुस्तके परत करावीत. अन्यथा प्रत्येक पुस्तकास रू. १० दंड आकारण्यात येईल.

### विद्यार्थी संसद

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ प्रमाणे २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षासाठी गुणवत्तेनुसार महाविद्यालयातील वर्ग प्रतिनिधींची विद्यार्थी संस्थेसाठी निवड केली जाईल.

१) अध्यक्ष – प्राचार्य

२) प्रभारी नियुक्त प्राध्यापक
३) वर्ग प्रतिनिधी
४) राष्ट्रीय सेवा योजना
५) क्रीडा विभाग
६) दोन नियुक्त विद्यार्थिनी प्रतिनिधी

**विद्यार्थी संसदेचे कार्य**

अ) विद्यार्थी संसदेची निर्मिती झाल्यानंतर एक महिन्यात विद्यार्थी संसदेचे उद्‌घाटन करणे.
ब) डिसेंबरअखेर स्नेहसंमेलनाचे आयोजन करणे.
क) मार्चपूर्वी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप/ शुभेच्छा देणे.
ड) विद्यार्थी संसदेच्या बैठका प्रत्येक सत्रात दोनदा घेणे.

**महाविद्यालयातील विविध उपक्रम :**

**१) राष्ट्रीय सेवा योजना**

वरिष्ठ महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष सद्‌गुण आहेत त्या विद्यार्थ्यांचा विकास व्हावा. त्यांना सामाजिक जाणीव, श्रम, प्रतिष्ठा, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन आत्मसात करता यावा. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक ऐक्य, सामाजिक प्रश्नांचे निर्मुलन करता यावे या दृष्टीने कृती व विचार करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये तयार व्हावी म्हणून विविध उपक्रम राबविले जातात.

राष्ट्रीय सेवा योजनेत निवडक १२५ विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते. पैकी ६५ उत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड करून ७ (सात) दिवस ग्रामीण भागात शिबीर आयोजित करून तेथे विशेष मार्गदर्शन, राष्ट्रीय कार्याची माहिती दिली जाते.

रक्तदान, झोपडपट्टी सर्व्हेक्षण, अंध, अपंगांची मैत्री, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदतकार्य, स्वच्छता मोहीम या विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे.

याबरोबरच वर्तमान सामाजिक जीवनातील चालू घडामोडींवर विविध परिसंवाद,चर्चासत्रांचे आयोजन केली जातात. विद्यार्थ्यांचा सहभाग मान्यवर अभ्यासकांचे व तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळवून त्याचा लाभ शिबिरार्थींना दिला जातो.

राष्ट्रीय सेवा योजनेत दोन वर्ष राहिलेल्या विद्यार्थ्यास प्रमाणपत्र देण्यात येते. तिसऱ्या वर्षात कार्यरत असलेल्या उत्कृष्ट गुणवंत स्वयंसेवक म्हणून दोन विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिके दिली जातात.

**शैक्षणिक सहल :**

विद्यार्थ्यांची आवड व सहभाग लक्षात घेऊन विविध विषयांच्या शैक्षणिक सहलींचे आयोजन केले जाते. दीपावलीच्या सुटीतच सहलीचे आयोजन केले जाईल. प्रसंगी महाविद्यालय सहलीचे नियोजन रद्द करण्याचा निर्णयही घेऊ शकते.

**व्याख्यानमाला :**

महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील नागरिक यांचे प्रबोधन व्हावे, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, वाङ्मयीन आर्थिक विचारांना चालना मिळावी या दृष्टीने **मातोश्री सुशीलादेवी देशमुख स्मृती प्रित्यर्थ मातोश्री व्याख्यानमाला** आयोजित केली जाते.

**क्रीडा विभाग :**

महाविद्यालयातील सुसज्ज असे क्रीडांगण असून महाविद्यालयातील युवतींच्या अंगी खिलाडूवृत्तीची आवड निर्माण व्हावी, देशी-विदेशी खेळांची माहिती मिळावी, विविध खेळांचे नैपुण्य आत्मसात करता यावे तथापि युवकांनी आरोग्याचे संवर्धन करावे, सुदृढ शरीराची जोपासना करावी यासाठी महाविद्यालयातील क्रीडा विभाग विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन कार्यरत आहे.

बी.ए.च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग मान्यता प्राप्त मानवी हक्क अयोग – फऊंडेशन कोर्से (३महिने), (६ महिने) सर्टीफीकेट कोर्स उपलब्ध.

**भाषा विकास अध्यापन कक्ष :**

युवकांमध्ये भाषिक ज्ञान व भाषा समृध्दी असलेले व्यक्तिमत्व तयार व्हावे, इंग्रजी, हिंदी भाषेबरोबरच मातृभाषेतून संपूर्ण व्यवहार करावयाचे ज्ञान मिळावे, विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती, लेखनशैली विकसीत व्हावी यासाठी भाषा अध्यापन कक्ष निर्माण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :**

शासकीय व निमशासकीय क्षेत्रात स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झाल्याशिवाय विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होत नाही म्हणून स्पर्धा परीक्षेचा विद्यार्थ्यांना अभ्यास व्हावा, त्यांना स्पर्धा परीक्षांना सामोरे जाता यावे म्हणून स्पर्धा परीक्षेचे ग्रंथ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातील. वेळोवेळी स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असे तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते.

**सांस्कृतिक मंडळ :**

महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग मंडळ युवक महोत्सवासाठी, स्नेहसंमेलनासाठी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना चालना मिळावी, युवकांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक मंडळ युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करते.

**वाङ्मय मंडळ :**

विद्यार्थी युवकांमध्ये सृजनशील, लेखनकौशल्य घडावे, युवकांमधील रसिकता फुलावी, आकलन, आस्वाद, अविष्कार, क्षमतेचा विकास व्हावा म्हणून महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ विभाग कार्यरत आहे.

युवकांच्या कविता, कथा, स्फूट, ललितलेखन, निबंध, वैचारिक साहित्य इत्यादींमध्ये विद्यार्थ्यांची आवड व अभिवृध्दी निर्माण व्हावी, स्वतंत्र लेखन क्षमतेचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांच्या लेखनाला चालना मिळावी, सृजनक्षमतेचा स्वतंत्र अंकुर फुलावा म्हणून वाङ्मय मंडळ प्रयत्नशील आहे. त्यसाठी वाङ्मय मंडळाच्या व्यासपीठावर विद्यार्थ्यांना मान्यवर लेखक व विचारवंतांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते. या मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांची समिती स्थापन करून वाङ्मय मंडळाकडून भित्तीपत्रक चालविण्यात येते. यामध्ये गुणी विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन त्यांच्या दर्जेदार साहित्यनिर्मितीला भित्तीपत्रकातून प्रसिध्दी दिली जाते.

याबरोबरच वक्तृत्व व वादविवाद मंडळ महाविद्यालयातील वाक्पटू, विद्यार्थ्यांना त्यांची चाचणी, क्षमता व वक्तृत्व पाहून विविध विभागीय व आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संधी दिली जाते.

**वार्षिकांक :**

युवकांमध्ये असलेल्या सुप्त लेखनशैलीचा आविष्कार व्हावा, त्यांची सृजनशीलता विकसित व्हावी, मर्मज्ञता प्रकट व्हावी, युवकांच्या भावनात्मक सौंदर्याचं संवर्धन व्हावे म्हणून महाविद्यालयीन वार्षिकांक प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद पाहून वार्षिक अंक प्रकाशित केला जाईल.

**सायकल स्टॅण्ड :**

१) ज्या विद्यार्थ्याकडे स्वत:ची सायकल आहे त्यांनी आपली सायकल सायकलस्टॅण्डवरच ठेवावी. महाविद्यालयाच्या परिसरात अन्यत्र कोठेही सायकल ठेवू नये.

२) आपल्या सायकलची नोंदवहीत नोंद करून घ्यावी.

३) सायकलला कुलूप लावावे.

४) अल्प काळासाठी सायकलस्टॅण्डवर सायकल ठेवण्यास प्रत्येक दिवसाला ०१ पैसे शुल्क द्यावे.

५) वार्षिक सायकल स्टॅण्डचे शुल्क रूपये १००/- देऊन पावती घ्यावी.

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय,लातूर

● वरिष्ठ विभाग ●

| | |
|---|---|
| डॉ. श्री. अजय भाऊसाहेब पाटील | प्राचार्य |
| प्रा. डॉ. श्री. करजगी मल्लिकार्जुन बाबूराव | इंग्रजी |
| प्रा. डॉ. श्री. येडले शंकरानंद किसनराव | मराठी |
| प्रा. डॉ. सौ. कीर्ते सविता चोखोबा | हिंदी |
| प्रा. डॉ. श्री. बनसोडे कुमार दगडू | हिंदी |
| प्रा. श्री. कांबळे बाळू आत्माराम | इतिहास |
| प्रा. श्री. मेकेवाड विजयकुमार बाबाराव | इतिहास |
| प्रा. श्री. भोसले सुनील विनायकराव | भूगोल |
| प्रा. सौ. पवार संजयादेवी गणपतराव | भूगोल |
| प्रा. डॉ. श्री. मलवाडे वेदप्रकाश अविनाश | समाजशास्त्र |
| प्रा. सौ. गायकवाड अनिता श्रीकांत | समाजशास्त्र |
| प्रा. डॉ. श्री. पलमंटे माधव पांडूरंग | अर्थशास्त्र |
| प्रा. श्री. देशमुख गुरूनाथ सुधाकरराव | अर्थशास्त्र |
| प्रा. श्री. मोहाळे शिवाजी बाबूराव | राज्यशास्त्र |
| प्रा. श्री. चव्हाण शंकर लोभाजी | राज्यशास्त्र |
| प्रा.डॉ. श्री. देशमुख प्रदीप नागनाथराव | क्रीडा विभाग |
| प्रा. डॉ.सौ. बनकर सुरेखा सिताराम | मराठी |
| सौ. पालकर रत्नाबाई देवराव | ग्रंथपाल |

● कनिष्ठ कला / वाणिज्य विभाग ●

| | |
|---|---|
| प्रा. श्री. देशमुख दिलीप आबासाहेब **(समन्वयक)** | भूगोल |
| प्रा. सौ. गिरी कलुबाई देवगीर | राज्यशास्त्र/पर्यावरण |
| प्रा. श्री. शास्त्री जयंत माणिकराव | हिंदी |
| प्रा. सौ. देशमुख वैजयंता व्यंकटराव | मराठी |
| प्रा. सौ. पाटील सीमा त्रिंबकराव | समाजशास्त्र/इतिहास |
| प्रा. श्री. लोंढे दादासाहेब मुरलीधर | इंग्रजी |
| प्रा. सौ. शिराळकर अरूणा नारायणराव | लेखांकन, वाणिज्य संघटन/ शा. शिक्षण |
| प्रा. सौ. यादव सविता शिवाजीराव | अर्थशास्त्र/सहकार |
| प्रा. श्री. गायकवाड बापू शांतकुमार | वाणिज्य संघटन/ सचिवांची कार्यपध्दती |

## •कनिष्ठ विज्ञान विभाग•

| | |
|---|---|
| प्रा. श्री. पाटील उदयकुमार वसंतराव | जीवशास्त्र |
| प्रा. श्री. मोगरगे हरिश्चंद्र गोविंदराव(विज्ञान विभाग प्रमुख) | भौतिकशास्त्र |
| प्रा. सौ. पवार छाया शिवाजीराव | रसायनशास्त्र |
| प्रा. सौ. इंगळे अनुराधा तानाजीराव | गणित |

## •किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम•
## एच.एस.सी. व्होकेशनल

| | |
|---|---|
| प्रा. श्री. जाधव प्रकाश निवृत्तीराव | लेखांकन व अंकेक्षण |
| प्रा. श्री. बलगोरे मोहन विठ्ठलराव | फलोत्पादन |
| प्रा. श्री. मोरे संजय पांडुरंग | पीकशास्त्र |
| प्रा. श्री. ढमाले रामकिसन तुळशीराम | लेखांकन व अंकेक्षण |
| प्रा. श्री. देशमुख राजकुमार मधुकरराव(सि.ई.टी. प्रमुख) | फलोत्पादन |
| प्रा. शिंदे धनराज रामराव | पीकशास्त्र |

## •कार्यालयीन कर्मचारी वृंद•

| | |
|---|---|
| श्री. देशमुख संजय निवृत्तीराव | अधीक्षक |
| श्री. भुतडा सत्यनारायण मुरलीधर | मुख्य लिपीक |
| श्री. चव्हाण शिवाजी पांडुरंगराव | वरिष्ठ लिपीक |
| श्री. देशमुख राजपाल लालासाहेब | कनिष्ठ लिपीक |
| श्रीमती कांबळे चंद्रकला कोंडीराम | कनिष्ठ लिपीक |
| श्री. पाटील प्रकाश शहाजीराव | कनिष्ठ लिपीक |
| श्री. मुंढे संजीव हणमंतराव | प्रयोगशाळा सहायक |
| श्री. पठाण विक्रम पिरसाहेब | ग्रंथालय परिचर |
| श्री. बनसोडे गोविंद शामराव | ग्रंथालय परिचर |
| श्री. मेकले केरबा तुकाराम | सेवक |
| श्री. साबळे जीवन हरिबा | सेवक |
| श्री. गुंठे शिवशंकर गणपती | सेवक |
| श्री. सारगे अनिल शिवदास | सेवक |
| श्री. कुंभार बालासाहेब वसंत | सेवक |

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय,लातूर

• विविध पारितोषिके •

| अ.क्र. | प्रस्तुतकर्ता | पारितोषिकाचे नाव | रक्कम | पारितोषिकाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. देशमुख संजय निवृत्तीराव | स्व. निवृत्तीराव देशमुख | १००१ | सुशीलभूषण पुरस्कार प्राप्त कर्त्यास रोख रक्कम |
| २ | प्राचार्य डॉ. पाटील अजय भाऊसाहेब | स्व. बाळासाहेब पाटील | ५०१ | बी.ए.तृतीय लोकप्रशासन विषयात प्रथम |
| ३ | प्राचार्य डॉ. पाटील अजय भाऊसाहेब | प्रयागबाई बाळासाहेब पाटील | ५०१ | बी.ए.प्रथम वर्षातील सर्वाधिक उपस्थिती विद्यार्थी सत्रनिहाय |
| ४ | डॉ.श्री. करजगी मल्लिकार्जून बाबूराव | स्व. अमृता बाबासाहेब रामणे | ५०१ | बी.ए.तृतीय इंग्रजी विषयात प्रथम |
| ५ | डॉ.श्री. करजगी मल्लिकार्जून बाबूराव | स्व. सरस्वती बाबुराव करजगी | ५०१ | बी.ए. प्रथम दै. इंग्रजी विषयात मुलीत प्रथम |
| ६ | डॉ. येडले शंकर किशनराव | स्व. किशनराव सदाशिव येडले | ५०१ | बी.ए. तृतीय मराठी विषयात प्रथम |
| ७ | डॉ. बनकर सुरेखा सिताराम | बालाजी धोंडिराम बादाडे | ५०१ | बी.ए. प्रथम मराठी विषयात प्रथम |
| ८ | डॉ. सौ. किर्ते सविता चोखोबा | स्व. संभाजी मारोती उबाळे | ५०१ | बी.ए. तृतीय हिंदी विषयात प्रथम |
| ९ | डॉ. सौ. किर्ते सविता चोखोबा | सावित्रीबाई फुले | ५०१ | गुणवंत विद्यार्थिनी |
| १० | डॉ.श्री. बनसोडे कुमार दगडू | स्व. दगडोजीराव (दादा) देशमुख | ५०१ | रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक |
| ११ | डॉ.श्री. बनसोडे कुमार दगडू | स्व. विलासराव देशमुख | ५०१ | वक्तृत्व स्पर्धेत सर्वाधिक सहभाग |
| १२ | प्रा. कांबळे बाळू आत्माराम | स्व. प्रा. अर्जुन साबळे | ५०१ | बी.ए. तृतीय इतिहास विषयात प्रथम |
| १३ | प्रा. मेकेवाड विजयकुमार बाबाराव | स्व. बाबाराव केरबाजी मेकेवाड | ५०१ | बी.ए. प्रथम इतिहास विषयात प्रथम |
| १४ | डॉ. श्री. मलवाडे वेदप्रकाश अविनाश | स्व. तुकाराम मलवाडे | ५०१ | बी.ए. प्रथम समाजशास्त्र विषयात प्रथम |
| १५ | सौ. गायकवाड अनिता श्रीकांत | स्व. तारकराम खंडागळे | ५०१ | बी.ए. तृतीय समाजशास्त्र विषयात प्रथम |
| १६ | प्रा. मोहाळे शिवाजी बाबुराव | स्व. पंडीतराव गुणाजी मोहाळे | ५०१ | बी.ए. तृतीय राज्यशास्त्र विषयात प्रथम |
| १७ | प्रा. चव्हाण शंकर लोभाजी | स्व. सोनीबाई थावरू आडे | ५०१ | सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग |
| १८ | डॉ.श्री. पलमंटे माधव पांडुरंग | स्व. इंदिराबाई विठोबा पलमंटे | ५०१ | बी.ए. प्रथम अर्थशास्त्र विषयात प्रथम |
| १९ | प्रा. देशमुख गुरुनाथ सुधाकर | स्व. र.पु. कुरुळकर | ५०१ | बी.ए. तृतीय अर्थशास्त्र विषयात प्रथम |
| २० | प्रा. भोसले सुनील विनायकराव | स्व. त्रिंबकराव गोविंदराव भोसले | ५०१ | बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय भूगोल विषयात प्रथम |
| २१ | प्रा. भोसले सुनील विनायकराव | विनायकराव त्र्यंबकराव भोसले | ५०१ | बी.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय भूगोल विषयात प्रथम |
| २२ | प्रा.सौ. पवार संजयादेवी गणपतराव | स्व. अन्नपूर्णा गणपतराव पाटील | ५०१ | बी.ए. प्रथम भूगोल विषयात प्रथम |
| २३ | डॉ.श्री. देशमुख प्रदीप नागनाथराव | स्व. जनाबाई नागनाथराव देशमुख | १००१ | आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत विजयी खेळाडूस |
| २४ | डॉ.श्री. देशमुख प्रदीप नागनाथराव | स्व. जनाबाई नागनाथराव देशमुख | १००१ | आंतर विद्यापीठ स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थिनीस |

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय,लातूर

● विविध पारितोषिके ●

| अ.क्र. | प्रस्तुतकर्ता | पारितोषिकाचे नाव | रक्कम | पारितोषिकाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| २५ | सौ. सुरवसे रत्नाबाई बाबुराव | स्व. देवराव नारायण पालकर | डिक्शनरी | उत्कृष्ट वाचक |
| २६ | श्री. भुतडा सत्यनारायण मुरलीधर | स्व. प्रेमलता मिनीयार | ५०१ | बी.ए. द्वितीय सर्वाधिक उपस्थिती विद्यार्थी सत्रनिहाय |
| २७ | श्री. चव्हाण शिवाजी सर्जेराव | स्व. मोहन चव्हाण, हातोला | ५०१ | १२ वी परीक्षेत सर्वप्रथम |
| २८ | श्री. चव्हाण शिवाजी पांडुरंग | स्व. पांडुरंग माधवराव चव्हाण | ५०१ | कला, वाणिज्य, विज्ञान व किमान कौशल्य सर्वप्रथम इ. १२ वी |
| २९ | श्री. देशमुख राजपाल लालासाहेब | स्व. लालासाहेब लक्ष्मणराव देशमुख, लो. सावरगाव | ५०१ | इ. १२ वी कला शाखेत इंग्रजी विषयात सर्वप्रथम |
| ३० | श्रीमती कांबळे चंदा कोंडिराम | स्व. बालाजी मारोतीराव खैरमोडे | ५०१ | बी.ए. तृतीय मुलीत सर्वप्रथम |
| ३१ | श्री. पठाण विक्रम पिरसाहेब | स्व. विलासराव देशमुख | ५०१ | बी.ए. तृतीय सर्वप्रथम |
| ३२ | प्रा.श्री. देशमुख दिलीप आबासाहेब | स्व. केवळबाई आबासाहेब देशमुख | ५०१ | इ. १२ वी कला सर्व द्वितीय |
| ३३ | प्रा.सौ. गिरी कलुबाई देवगीर | स्व. सुलोचना छगन पुरी | ५०१ | इ. १२ वी राज्यशास्त्र विषयात प्रथम |
| ३४ | प्रा.सौ. गिरी कलुबाई देवगीर | सुगन पुरस्कार | ५०१ | इ. १२ वी कला सर्वप्रथम |
| ३५ | प्रा.सौ. पाटील सीमा त्रिंबकराव | स्व. ॲड. काशीराव पाटील | ५०१ | इ. १२ वी कला इतिहास विषयात सर्वप्रथम |
| ३६ | प्रा.सौ. पाटील सीमा त्रिंबकराव | स्व. ॲड. काशीराव पाटील | ५०१ | इ. १२ वी कला समाजशास्त्र विषयात सर्वप्रथम |
| ३७ | प्रा.सौ. यादव सविता शिवाजीराव | स्व. सूर्यकांत शिवाजीराव यादव | ५०१ | इ. १२ वी अर्थशास्त्र विषयात सर्वप्रथम |
| ३८ | प्रा.सौ. देशमुख वैजयंता व्यंकटराव | स्व. किशनराव देशमुख | ५०१ | इ. १२ वी मराठी विषयात सर्वप्रथम |
| ३९ | प्रा.श्री. शास्त्री जयंत माणिकराव | स्व. माणिकराव शास्त्री | ५०१ | इ. १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान हिंदी विषयात सर्वप्रथम |
| ४० | प्रा.श्री. लोंढे दादासाहेब मुरलीधर | माजी कुलगुरू प्राचार्य मधुकरराव गायकवाड | ५०१ | इ. १२ वी कला, वाणिज्य, विज्ञान, एम.सी.व्ही.सी. इंग्रजी विषयात सर्वप्रथम |
| ४१ | प्रा.श्री. लोंढे दादासाहेब मुरलीधर | विक्रम सिंगन पारितोषिक | ५०१ | इ. १२ वी ज्ञान मधून Eng. CET प्रथम |
| ४२ | प्रा.सौ. शिराळकर अरुणा नारायणराव | स्व. अरुणादेवी सिद्धेश्वर बलगोरे | ५०१ | इ. १२ वी वाणिज्यमध्ये सर्वप्रथम |
| ४३ | प्रा.सौ. शिराळकर अरुणा नारायणराव | स्व. शांताबाई नारायणराव शिराळकर | ५०१ | इ. १२ वी वाणिज्य अकौंन्टसीमध्ये सर्वप्रथम |
| ४४ | प्रा. श्री. गायकवाड बापू शांतकुमार | स्मृतिशेष शांतकुमार हरिबा गायकवाड | ५०१ | इ. १२ वी चिटणीसाची कार्यपद्धती विषयात सर्वप्रथम |

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालय,लातूर

## • विविध पारितोषिके •

| अ.क्र. | प्रस्तुतकर्ता | पारितोषिकाचे नाव | रक्कम | पारितोषिकाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| ४५ | प्रा. श्री. गायकवाड बापू शांतकुमार | सावित्रीबाई फुले | ५०१ | इ. १२ वी मुलीमध्ये सर्वप्रथम |
| ४६ | प्रा.श्री. पाटील उदयकुमार वसंतराव | स्व. प्रयागबाई भवानराव पाटील | ५०१ | CET परीक्षेत महाविद्यालयात सर्वप्रथम |
| ४७ | प्रा.श्री. पाटील उदयकुमार वसंतराव | स्व. भवानराव गणपतराव पाटील | ५०१ | इ. १२ वी विज्ञान वर्गात सर्वप्रथम |
| ४८ | प्रा.श्री. पाटील उदयकुमार वसंतराव | स्व. भवानराव गणपतराव पाटील | ५०१ | इ. १२ वी विज्ञान जीवशास्त्र विषयात सर्वप्रथम |
| ४९ | प्रा.सौ. इंगळे अनुराधा तानाजीराव | स्व. सुभद्राबाई बाजीराव खोचरे | ५०१ | इ. १२ वी विज्ञान गणित विषयात सर्वप्रथम |
| ५० | प्रा.श्री. मोगरगे हरिश्चंद्र गोविंदराव | प्राचार्य अनिरुद्ध जाधव | ५०१ | इ. १२ वी विज्ञान भौतिकशास्त्र विषयात सर्वप्रथम |
| ५१ | प्रा.सौ. पवार छाया शिवाजीराव | स्व. सौ. त्रिवेणी शिवाजीराव पवार | ५०१ | इ. १२ वी विज्ञान रसायनशास्त्र विषयात सर्वप्रथम |
| ५२ | श्री. मुंढे संजीव हणमंतराव | स्व. बाजीराव नारायणराव मुंढे | ५०१ | CET / JEE मुलीमध्ये सर्वप्रथम |
| ५३ | प्रा.श्री. जाधव प्रकाश निवृत्तीराव | स्व. इंदिराबाई रावणराव देशमुख | ५०१ | इ. १२ वी अंकेक्षण व लेखांकनामध्ये प्रथम |
| ५४ | प्रा.श्री. मोरे संजय पांडुरंग | स्व. पांडुरंग सादबा मोरे | २१०१ | कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थी |
| ५५ | प्रा.श्री. मोरे संजय पांडुरंग | स्व. पांडुरंग सादबा मोरे | ५०१ | इ. १२ वी किमान कौशल्य क्रॉप सायन्स विषयात प्रथम |
| ५६ | प्रा.श्री. मोरे संजय पांडुरंग | स्व. पांडुरंग सादबा मोरे | ५०१ | इ. १२ वी विज्ञान क्रॉप सायन्स विषयात प्रथम |
| ५७ | प्रा.श्री. बलगोरे मोहन विठ्ठलराव | स्व. निर्मल शिवाजी शिराळकर | ५०१ | इ. १२ वी कौशल्य फलोत्पादनशास्त्र विषयात प्रथम |
| ५८ | प्रा.श्री. ढमाले रामकिशन तुळशीराम | स्व. तुळशीराम ज्ञानोबा ढमाले | ५०१ | इ. १२ वी किमान कौशल्य अकौंटन्सी विषयात द्वितीय |
| ५९ | प्रा.श्री. देशमुख राजकुमार मधुकरराव | स्व. सुकुमार माणिकराव जाधव | ५०१ | JEE सर्वप्रथम |
| ६० | प्रा.श्री. देशमुख राजकुमार मधुकरराव | स्व. विजयकुमार मधुकरराव देशमुख | ५०१ | इ. १२ वी किमान कौशल्य शाखेतून सर्वप्रथम |
| ६१ | प्रा.श्री. शिंदे धनराज रामराव | स्व. रामराव संभाजीराव देशमुख | ५०१ | सुशीलभूषण पुरस्कार प्राप्तकर्त्यांस रोख रक्कम |
| ६२ | श्री. पाटील प्रकाश शहाजीराव | स्व. ॲड. बी.व्ही. काळे | ५०१ | इ. १२ वी पीकशास्त्र विषयात विशेष प्राविण्यप्राप्त विद्यार्थी |
| ६३ | प्रा. यादव सविता शिवाजीराव | स्व. बब्रुवान काळे | ५०१ | इ. १२ वी सहकार विषयात विशेष प्राविण्य |

## २०१६ मधील विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| हाळे विजयकुमार | | कु.माने प्रेरणा | कु.शेख साकीया | वाकुरे संकेत | कु.चव्हाण शिवानी | कु.शेख सादिया | कु.उजेडे फिरदोस |
| बोर्ड ८८.४६% | बोर्ड ८४.३०% | बोर्ड ७२.१५% | बोर्ड ७२.००% | बोर्ड ७०.९२% | बोर्ड ७०.९६% | बोर्ड ७०.१५% | बोर्ड ७०.१५% |
| जेइई१४४ | जेइई१०४ | | | | सीईटी१३६ | | |
| सीईटी१७२ | सीईटी१५६ | | | | | | |

## २०१६ मधील वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी



| | | | | |
|---|---|---|---|---|
| कु.शिंदे संगीता | कु.कोंडेकर रेश्मा | भोसले गणेश | सय्यद तब्बुसम | गरड अण्णा |
| बोर्ड ८७.५३% | बोर्ड ७७.२३% | बोर्ड ७५.५३% | बोर्ड ७५.००% | बोर्ड ७५.१५% |

## २०१६ मधील कला शाखेतील गुणवंत विद्यार्थी



| | | |
|---|---|---|
| नाथबोने परमेश्वर | कु.तोगे प्रियंका | कु.इंगळे कविता |
| बोर्ड ८२.१५% | बोर्ड ७७.२९% | बोर्ड ७५.०७% |

## २०१६ मधील एच.एस.सी. व्होकेशनल शाखेतील गुणवंत विद्यार्थी



| | | |
|---|---|---|
| चाफेकरंडे अजय | मनियार मंहमद रियाजउद्दीन | मळगे प्रशांत |
| बोर्ड ६९.५३% | बोर्ड ६५.६९% | बोर्ड ६५.३८% |
| (पीकशास्त्र) | (फलोत्पादनशास्त्र) | (अकाऊटींग अॅन्ड ऑडीटींग) |






गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समयी संस्थेचे अध्यक्ष मा. दिलीपरावजी देशमुख साहेब
प्रा.डॉ. अजय पाटील समन्वयक प्रा. देशमुख डी.ए. विज्ञान विभाग प्रमुख प्रा. मोगरगे एच.जी.